आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३० नोव्हेंबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक असल्यानं प्रचाराला जोर

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी नोंदवला एफआयआर

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५० धावांचं आव्हान /सर्वाधिक षटकार ठोकण्याचा रोहीत शर्माचा नवा विक्रम, तर विराट कोहलीचं शानदार शतक

**आणि**

- येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

युवकांची निष्ठा हेच विकसित भारताचं सामर्थ्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात च्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. तीव्र इच्छा, सामूहिक शक्ती, आणि संघभावनेनं काम करण्यावर विश्वास असेल तर कठीण कामातही यश मिळतं असं ते म्हणाले. या संदर्भात त्यांनी इस्त्रोनं मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याच्या स्पर्धेची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सामायिक केला. या स्पर्धेत पुण्यातल्या एका संघानं यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला.

हैदराबाद इथं विमानांच्या देखभाल, दुरुस्ती आणि संपूर्ण तपासणी केंद्राचं उद्घाटन, नौदलाच्या ताफ्यात स्वदेशनिर्मित आयएनएस माहे या युद्धनौकेचा झालेला समावेशाचा

उल्लेखही त्यांनी केला. कृषी क्षेत्रातली देशाची प्रगती सांगताना, देशानं ३५ कोटी ७० लाख टन इतक्या अन्नधान्याचं उत्पादन करून ऐतिहासिक विक्रम केला असल्याचं ते म्हणाले.

गेल्या काही वर्षांत मधाची निर्यात तिपटीपेक्षा जास्त वाढली असून, देशाचं मध उत्पादन दीड लाख टनांपेक्षा जास्त झालं आहे, मध अभियानाअंतर्गत खादी ग्रामोद्योगानं सव्वा दोन लाखापेक्षा जास्त मधमाशी पालन पेट्यांचं वाटप केलं आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट - MKB HONEY**

क्रीडा क्षेत्रातल्या यशाचा उल्लेखही त्यांनी केला. महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद, जपानमधल्या डेफ ऑलिम्पिक, तसंच जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारतानं मिळवलेलं यश याविषयी त्यांनी सांगितलं. दृष्टीहीन महिलांनी जिंकलेला पहिलाच टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक म्हणजे देशाच्या क्रीडा इतिहासातल्या सर्वात मोठ्या यशांपैकी एक आहे असं ते म्हणाले. देशाचा गौरव वाढवणाऱ्या सांस्कृतिक आणि इतर घडामोडींचाही उल्लेख त्यांनी केला. काही दिवसांपूर्वी साजरा झालेला संविधान दिन, वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभर होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वजाचं आरोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण यांविषयी त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवानिमित्त विविध देशांत झालेल्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या जी ट्वेंटी परिषदेच्या निमित्तानंही आपण जागतिक नेत्यांना दिलेल्या भेटवस्तूंमध्ये स्थानिक भावनेवरच भर दिला असं ते म्हणाले. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या खरेदीसाठीही नागरिकांनी देशात बनलेल्या वस्तुंची खरेदी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

देशाच्या हिवाळी पर्यटन क्षमतांबद्दल सांगताना, हिवाळी पर्यटनासाठी हिमालयातल्या डोंगररांगाचा विचार करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळं राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते

आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. तसंच प्रशासनाकडून २ डिसेंबरला होणाऱ्या मतदानाची तयारी सुरू असून काही ठिकाणी टपाली मतदानाला सुरुवात होत आहे.

बीड जिल्ह्यातल्या सहा नगरपालिकांच्या निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातल्या बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, परळी आणि अंबाजोगाई या सहा नगरपरिषदांमधे दोन तारखेला मतदान होणार आहे. परळी नगरपरिषदेतले दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत, तर गेवराई नगरपरिषद निवडणुकीतल्या एका उमेदवाराचं निधन झाल्यामुळे एका प्रभागातली निवडणूक स्थगित केली आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड आणि धर्माबाद नगरपरिषदा तसंच भोकर, लोहा आणि कुंडलवाडी नगरपरिषदांमधल्या तीन प्रभागांमधली निवडणूक प्रक्रिया नगराध्यक्षपदासाठी अपील असल्यामुळे पुढे ढकलली असून या ठिकाणी २ डिसेंबर ऐवजी २० डिसेंबरला मतदान होणार आहे.

भंडारा शहरात आज शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा झाली. यात सिने अभिनेते गोविंदा, तुषार कपूर, अभिनेत्री झरीन खान सहभागी  झाले.

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. त्या पार्श्वभूमीवर  केंद्र सरकारनं आज सकाळी सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यसभेतले सभागृह नेते जे पी नड्डा, संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन बैठकीला उपस्थित होते. कांग्रेसचे गौरव गोगोई, शिवसेनेचे नरेश म्हस्के, द्रमुकचे तिरुचि शिवा, तृणमूलचे डेरेक ओब्रायन, इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले होते. बैठक सकारात्मक वातावरणात झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी नंतर वार्ताहरांना सांगितलं.  सभागृहाच्या नियमांनुसार मांडलेल्या कोणत्याही मुद्द्यावर सरकार चर्चेला तयार आहे**,** असं ते म्हणाले.

उद्यापासून सुरु होणारं हे अधिवेशन येत्या १९ डिसेंबरपर्यंत चालेल. या अधिवेशनात मतदार पुनरिक्षण, दिल्ली बॉम्बस्फोट तसंच परराष्ट्र संबधांबद्दल विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे.

**<><><><><>**

राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज मावळते मुख्य सचिव राजेश कुमार यांच्याकडून पदभार स्वीकारला. मुंबईत मंत्रालयातल्या मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमात विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८९च्या तुकडीतले महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत. ते पुढच्या वर्षी नोव्हेंबर अखेर सेवानिवृत्त होतील.

**<><><><><>**

मुंबईच्या बोरिवली इथं आज केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते दिव्यांग बालकांसाठी आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाचं उद्धाटन केलं. या स्पर्धेमध्ये एकूण ४५० पेक्षा अधिक स्पर्धक, ९०० पालक आणि २०० स्वयंसेवकांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पीयूष गोयल यांनी आज मंडपेश्वर पब्लिक स्कूलचंही उद्धघाटन केल असून या शाळेत अत्याधुनिक पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. मनी लाँडरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या तक्रारीवरुन दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने हा एफआयआर नोंदला आहे. काँग्रेसचे अन्य नेते सुमन दुबे, सॅम पत्रोदा यांच्यासह एकूण ९ जणांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई खोडसाळ पणाची असून केवळ काँग्रेस नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी केली जात असल्याची टीका पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज झारखंडमध्ये रांची इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३५० धावांचं आव्हान ठेवलं आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३४९ धावा केल्या. सलामीवीर यशस्वी जयस्वाल १८ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर रोहीत शर्मा आणि विराट कोहली यांनी धडाकेबाज १३६ धावांची भागिदारी करत

डाव सावरला. रोहीत शर्मा ५७ धावा करून बाद झाला. त्यानं एकदिवसीय क्रिकेटमधे सर्वाधिक षटकार मारण्याचा शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला. आफ्रिदीनं त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीत एकूण ३५१ षटकार ठोकले होते. आता रोहितनं ३५२ षटकारांचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

विराट कोहलीनं आज शतक ठोकलं. त्यानं १२० चेंडूत १३५ धावा केल्या, त्यात ११ चौकार आणि ७ षटकारांचा समावेश होता. के एल राहुलनं ६०, तर रविंद्र जडेजानं ३२ धावांचं योगदान दिलं.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १५ षटकात ४ बाद ७७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरीचं विजेतेपद ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडगोळीनं पटकावलं आहे. लखनौमधे झालेल्या अंतिम सामन्यात आज त्यांनी जपानच्या काहो ओसावा आणि माई तानाबे या जोडीचा १७-२१, २१-१३, आणि २१ -१५ असा पराभव केला.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकोणसत्तराव्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त चैत्यभूमीवर आदरांजली वाहण्यास येणाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर पुस्तिकेचं प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज केलं.

**<><><><><>**

संवेदनशीलता, प्रतिसाद देण्याची क्षमता आणि व्यावसायिकता वाढवून लोकांची पोलिसांबद्दलची धारणा बदलण्याची गरज असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. रायपूर इथं पोलीस महासंचालकांच्या ६० व्या अखिल भारतीय परिषदेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या दंतेवाडा जिल्ह्यात आज डीव्हीसीएम, एसीएम कॅडरच्या ३७ नक्षली अतिरेक्यांनी आत्मसमर्पण केलं. यातल्या २७ जणांवर ६५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी सांगितलं की पूना मार्गम या अभियानाला प्रतिसाद देत शेकडो नक्षली मुख्य प्रवाहात येत आहेत.

<><><><><>

एनडीए अर्थात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीचं दीक्षांत संचलन पुण्यात खडकवासला इथं आज सकाळी झालं.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय घट झाली. तर दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//